# तलत मेहमूद - भाग २



आता कलकत्त्याला आल्यावर तलतने स्वत:साठी नवीन नाव धारण केले. सहज आवडेल असे नाव - तपन कुमार ! त्यांनी ह्या नावाखाली बरीच हिंदी आणि बंगाली गाणी गायली. थोड्याच काळात, 'आता ह्यापुढे काय?' हा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. मग त्याने ठरवले की 'बस्स, आता फक्त गाणे नको, तर गायन आणि अभिनय दोन्ही करावे.'

तो दिसायला तर सुंदर होताच आणि चित्रपटात काम करणारे कलाकार गायकापेक्षा केंव्हाही जास्त कमावत असत. त्यामुळे त्याच्या आजूबाजूच्या परिचितांनी त्याला असा सल्ला दिला की त्याने गाणे सोडू नये पण त्याबरोबर चित्रपटात काम मिळत असले तर तेही करावे. कलकत्त्यात असतांना त्याने एकंदर तीन चित्रपटांत काम केले. पैकी एक म्हणजे १९४५ साली पी. सी. बारुआ यांच्या 'राजलक्ष्मी' चित्रपटात साधूचे काम केले. १९४९ सालपर्यंत तो कलकत्त्यात राहिला आणि नंतर कलकत्त्यापेक्षां मुंबईत चित्रपटांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत असल्याने तिथे आपल्याला जास्त चांगली संधी मिळेल असे वाटल्याने त्याने मुंबईची वाट धरली.

मुंबईत आल्यावर त्याने प्रथम आपले नवीन धारण केलेले तपनकुमार हे नांव सोडून तलत मेहमूद हे आपले मूळ नांव धारण केले. दिग्गज संगीतकार अनिल विश्वास हे त्याच्या बरेच अगोदर कलकत्त्याहूनच मुंबईत येऊन दाखल झाले होते. त्यामुळे त्याने प्रथम त्यांची भेट घेतली. त्या प्रतिभावंताला 'तपनकुमार'च्या गायकीची जाण होतीच. १९५० साली मखमली आर्त आवाजाच्या

तलतला हिंदी चित्रपटात पार्श्वगायनाची पहिली संधी अनिल विश्वास यांनीच दिली. ते गाणे म्हणजे 'आरज़ू' चित्रपटातील 'ए दिल मुझे ऐसी जग़ह ले चल जहाँ कोई ना हो' तो एक अपूर्व प्रयोगच म्हणावा लागेल. मजरूहच्या या गीतामध्ये तलतने आपला आत्माच ओतला होता असे वाटते.

त्यानंतर त्याच वर्षी 'जब किसीके रूख़ पे (ज़ुल्फ़ें) आके लहराने लगी' ह्या 'अनमोल रतन' चित्रपटातील गाण्यासाठी संगीतकार विनोदने तलतचा आवाज वापरला. त्याच वर्षी 'बाबुल' चित्रपट आला आणि त्या चित्रपटातील बरीच गाणी नौशादच्या सुरावटीखाली तलतने गायली. त्यापैकी एक म्हणजे शमशाद सोबत गायलेले युगल गीत 'मिलतेही आँखें दिल हुआ ......'  आतां सर्वानांच कलकत्त्याहून आलेला आवाज हवाहवासा वाटू लागला. श्याम सुंदर यांनी 'भाई बेहन' मधे, खेमचंद प्रकाश यांनी 'जान पेहचान' मधे, बुलो सी. रानी यांनी 'जोगन' मधे, लच्छी राम यांनी 'मधुबाला' मधे, हफ़ीज़ ख़ान यांनी 'मेहरबानी' मधे, स्नेहल भाटकर यांनी 'पगले' मध्ये, एस. मोहिंदर यांनी 'शादी की रात' यामधे अशा रितीने त्यांना पदार्पणाच्या पहिल्याच वर्षी अनेक गाणी मिळाली. तसे पहातां हा एक मोठा पराक्रमच म्हणावा लागेल! जणू काय लोकं म्हणत होते 'तलत साब, आतांपर्यंत कुठे लपून बसला होता आपण?

त्यानंतरच्या वर्षी त्याने पुन्हां अनिल विश्वास यांच्यासाठी 'आराम' मध्ये आवाज दिला. ह्या चित्रपटात त्यांनी एक छोटीशीच भूमिका केली होती - ती म्हणजे स्वत: 'तलत' म्हणूनच 'शुक्रिया ए प्यार तेरा' हे गाणे म्हटले होते. तसेच याच वर्षी मदनमोहनसाठी 'अदा' मध्ये, एस. डी. बर्मन साठी 'बहार', 'बुज़दिल' आणि 'एक नज़र'. अशीही गाणी म्हटली. आता त्याच्यासाठी मागे वळून पहाणे ही बातच राहिली नाही! आतां फक्त पुढे पुढे आणि पुढेच जाणे होते. तलत आता लोकप्रियतेच्या शिखरावर पोचला होता.

तलतने एक गोष्ट मात्र ठरवून केली आणि ती म्हणजे कुठलेही गाणे स्वीकारण्यापूर्वी त्या गीताचे बोल काय आहेत हे तो पहात असे. लखनवी 'आदाबी' पार्श्वभूमी आणि उच्च नैतिक मूल्ये असल्यामुळे त्याने गाण्यांची निवड स्वतः ठरवली त्यामुळे चित्रपटातील किंवा चित्रपटाव्यतिरिक्त गायलेल्या गाण्यांच्या त्याच्या कारकिर्दीचे ते एक वैशिष्ट्य ठरले.

अशा रितीने शांत सागरी मौजेची सफर करीत असतांनाच पुन्हा एकदा त्याला करदारच्या 'दिल ए नादान' ह्या चित्रपटात प्रमुख नायकाच्या भूमिकेसाठी प्रस्ताव आला. त्याने तो आनंदाने स्वीकारलाही. दुर्दैवाने त्याच्या भूमिकेकडे कुणी लक्षच दिले नाही परंतु त्याची गाणी मात्र गाजली. 'ज़िन्दगी देने वाले सुन' हे अविस्मरणीय गाणे कुणाच्या मनांतून कधी जाईल का? तरीही तो अभिनय आणि गाणे हे दोन्ही करीत राहिला. एकंदर परिस्थिती समाधानकारक नसतानाही पुढील पाच वर्षांत एकूण आठ

चित्रपटांसाठी तो अभिनय आणि गायन अशी अवघड कसरत करीत असताना, ज्याच्यासाठी तलत अधून मधून पार्श्वगायन करीत असे त्या शम्मी कपूरने त्याला विचारले की बुवा तुझा गळा इतका सुंदर असताना तू त्यावरच सगळं लक्ष केंद्रित का करत नाहीस, जेणेकरून तुझ्या गायनात तू लक्षणीय कामगिरी करशील ?

बस्स! हा एवढा सल्ला त्याने अगदी मनावर घेतला आणि चित्रपटात काम करणे सोडून दिले. आता फक्त गायन हेच त्याने पक्के केले. पण आताही त्याने पूर्वीप्रमाणेच गाण्यातील शब्दार्थांना महत्व दिले. त्यामुळे तो गाणी निवडूनच गात असे. त्यामुळे त्याच्या नावावर भारंभार गाणी आढळून येत नाहीत. अर्थात ते एक कारण होतेच शिवाय फार वरच्या पट्टीतील गाणी किंवा उटपटांग टाईपची गाणी त्याच्या अवाक्याबाहेरची होती. हे सांगण्याचा मतितार्थ असा की जे उत्कृष्ट तेच देईन ह्या गोष्टीवर त्याचा ठाम विश्वास होता. सगळ्या लोकांना कसेही करून सतत खूश करण्याचा प्रयत्न त्याने कधीच केला नाही. उचित सुसंस्कृत शब्द आणि मृदू मखमली आवाजाची त्याची गाण्याची स्टाईल अत्युत्तमच होती. गझल तो एका विशिष्ट आकर्षक पद्धतीनेच म्हणत असल्याने सर्व पुरूष गझल गायकांमध्ये तो अतुलनीय भासत असे. गीत गाण्यात तर त्याचा वर्ग वेगळाच होता. ’रो रो बीता जीवन सारा’ आणि ’फिर प्यार किया फिर रोया’, तसेच ’विदाकी बेला तुमने कहा था भूल ना जाना लिख ना पाती’ ही अवर्णनीय गीते आठवणीतून कधीच जाणार नाहीत. ’बे-कैफ दिल है और जिये जा रहा हू मै’, ’आँख पडती है कही’ आणि ’मुझे कुछ खबर भी ना हो सकी’ ह्या गझलांची आठवणच किती सुखमय आहे. चित्रपटाव्यतिरिक्तच्या अशा कितीतरी रत्नासारख्या मोहविण्याऱ्या गझला आयुष्याला उजाळा देतात. अशा तऱ्हेची विविध गाणी, ऐकणाऱ्यांच्या हृदयाला स्पर्शून जगण्यालायक अर्थ देतात. ह्या गाण्यांमुळे तसेच ’फिर वही शाम’ (’जहानआरा’) आणि ’मुझे देखो, हसरत की तस्वीर हूँ मै’ (’बाझ’) ह्या सारख्या चित्रपटांतील भावपूर्ण गाण्यांमुळे तलत आपल्या रसिक श्रोत्यांना आपल्या वेधक वैशिष्टयांमुळे आणखीन जवळचा वाटतो.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories”

is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com